# प्रकरण ६ वे

# उ प सं हा र

## प्रकरण सहावे

## उपसंहार

### अभ्यासाचा उद्देश:

मिरज संस्थानातील प्रजापरिषदेचा लढा हा विषय शोध निबंधासाठी निवडीत असतांना प्रजापरिषदेच्या चळवळीमुळे मिरज संस्थानामध्ये जो राजकीय बदल आणि राजकीय विकास झाला त्याचा राजकीय दृष्टीने अभ्यास करणे हा या अभ्यासाचा हेतू होता. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात मिरज संस्थानात प्रजापरिषदेच्या वतीने प्रजेने आंदोलने करुन राजकीय अधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला.

दक्षिण महाराष्ट्रातील अठरा संस्थानांमध्ये कमी अधिक प्रमाणात राजकीय चळवळी झाल्या. मिरज संस्थान हे एक पटवर्धनीय संस्थान होते. या संस्थानात इतर पटवर्धनीय संस्थानापेक्षा अधिक प्रभावीरितीने प्रजेच्या चळवळी होऊन त्याद्वारे लोकांचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला. म्हणून मिरज संस्थानातील प्रजापरिषदेच्या राजकीय लढयाचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यात आला आहे. या शोध प्रबंधामध्ये मुख्यत: चार प्रश्नांचा उहापोह करण्यात आला आहे.

१) मिरज संस्थानात संस्थानी राजवटीविरुद्ध राजकीय चळवळीची उभारणी झाली आणि ती चळवळ प्रभावीरित्या चालविण्यात आली.

२) मिरज संस्थानातील प्रजापरिषदेच्या साराबंदी चळवळीचे राजकीय यश

३) मिरज संस्थानातील प्रजेना राज्यकारभारात राजकीय सहभागीत्व मिळवण्यासाठी कादेमंडळाची निर्मिती व त्या कायदेमंडळाचे कार्य.

४) मिरज संस्थानातील प्रजापरिषदेने विलिनीकरणाची चळवळ नेटाने करुन संस्थानी संघराज्याच्या कल्पनेस मूठमाती दिली.

५) या सर्व प्रश्नांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यात आला आहे. त्याचे विश्लेषण ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब करुन केले आहे. मिरज संस्थानातील राजकीय चळवळीचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन कागदपत्रे, वर्तमान पत्रे, नियतकालिके, संस्थानचे रेकॉर्डस, खाजगी कागदपत्रे, संस्थानिक वर्तमान पत्रे, संस्थानी चळवळीतील कांही प्रमुख व्यक्तींशी चर्चा, पुस्तके अशा प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

सारांश:

या शोध प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणांत, मिरज संस्थानची ऐतिहासिक पार्श्वभूमी दिलेली आहे. या प्रकरणात दक्षिण महाराष्ट्रातील पटवर्धनीय संस्थानांपैकी एक मिरज संस्थानची निर्मिती ही पेशव्यांच्या कालखंडात जहागिरी देण्याच्या पध्दतीतून कशी झाली ह्याची सविस्तर माहिती दिली आहे. दक्षिण महाराष्ट्रातील सर्व पटवर्धनीय संस्थानचे मुळ पुरुष हरिभट्ट बिन बाळंभट्ट पटवर्धन हे होते. त्यांचे वंशज श्री. गोविंद हरि पटवर्धन हे मिरज संस्थानचे मुळ संस्थापक होते. नंतर हे संस्थानिक इंग्रजांचे मांडलिक झाले. विसाव्या शतकाच्या पुर्वाधात प्रथम श्री. गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन व नंतर श्री. नारायण तात्या-

साहेब पटवर्धन हे या संस्थानचे प्रमुख झाले. मिरज संस्थानची इतर माहितीही या प्रकरणात दिली आहे. त्याच प्रमाणे इतर पटवर्धनी संस्थानातील राजकीय चळवळीचा ही यात थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

मिरज संस्थानात राजकीय चळवळीची उभारणी होण्याचे कारण म्हणजे या संस्थानच्या राजेसाहेबांनी, संस्थानचा राज्यकारभार हा, "संस्थान म्हणजे मी आणि मी म्हणजे संस्थान" असा फ्रान्सच्या चौदाव्या लुईप्रमाणे केला. मिरज संस्थानच्या प्रजेला राजा आपलाच आहे, हे दाखविण्यासाठी प्रजा माझी, मी प्रजेचा हे घोषवाक्य वारंवारपणे म्हटले परंतु संस्थानच्या राज्यकारभाराची अधिकारसुत्रे मात्र प्रजेला विश्वासात घेऊन कधीच वापरली नाहीत त्यामुळे मिरज संस्थानच्या सरंजामशाही, एकतंत्री राजेशाही विरुद्धच्या राजवटीबद्दल प्रजेच्या मनांत असंतोष निर्माण झाला आणि चळवळीस सुरुवात झाली.

या प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात, "मिरज संस्थान प्रजापरिषदेच्या वतीने केलेल्या विविध चळवळीचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. मिरज संस्थानात प्रजेने श्री. बा.वि. उर्फ तात्या शिखरे यांच्या नेतृत्वाखाली १९२२ साली मिरज संस्थान-प्रजापरिषदेची स्थापना केली. या सारख्या राजकीय संघटनेच्या माध्यमातून जवळजवळ अव्याहतपणे २६ वर्षे राजकीय लढा देऊन तो यशस्वी केला. अशा प्रकारचा राजकीय लढा देऊन तो यशस्वी केला. अशा प्रकारचा राजकीय लढा इतर पटवर्धनीय संस्थानापेक्षा या संस्थानात अधिक तीव्र आणि संघटितपणे झाला होता. मिरज संस्थान प्रजापरिषदेने राजकीय लढयाची उभारणी ही, मिरज संस्थानात

जबाबदार राज्यपध्दती अंमलात आणावी, प्रातिनिधिक कायदेमंडळ स्थापन करावे आणि संस्थानी प्रजेच्या लोकशाहीप्रणित नागरिक हक्क मिळावेत या मागण्यासाठी केली. प्रजापरिषदेने सनदशीर मार्गाचा अवलंब करून राजकीय सुधारणा मागितल्या आणि प्रजेच्या प्रतिनिधीकडे संस्थानची अधिकार सुत्रे सोपवावी म्हणून कार्यकारी मंडळाची, कायदेमंडळाची रचना करावी अशी सदैव मागणी केली. त्या प्रमाणे श्रीमंतानी दबावाखाली कार्यकारीमंडळ व कायदेमंडळामध्ये बराच कालावधी गेल्यानंतर बदल केला. या बदलाचे सर्व श्रेय मिरज संस्थानच्या प्रजेने केलेल्या राजकीय चळवळीला आहे. मिरज संस्थानातील प्रजापरिषदेचा राजकीय लढा हा शेवटपर्यंत आपल्या जबाबदार राज्य-पध्दतीच्या स्थापनेकरिता संघटित आणि प्रभावी स्वरूपाने टिकून राहिला. त्यामुळे संस्थानच्या राजेसाहेबांना लोकमताच्या मागणीनुसार हप्त्या-हप्त्याने का होईना स्वराज्यदान किंवा सत्तादान करावे लागेल.

या प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणांत, मिरज संस्थानांतील रयतेने सारा-वाढीच्या विरूध्द जी "साराबंदीची चळवळ" केली तिची सविस्तर चर्चा केली आहे. या संस्थानात ज्याप्रमाणे गुजराथेत बार्डोली येथे मोठा लढा झाला त्याचप्रमाणे मिरज संस्थानातील रयतेने लढा उभारून वाढीव शेतसाऱ्या विरूध्द सत्याग्रहाची चळवळ यशस्वी केली. मिरज संस्थानातील साराबंदी चळवळीचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे, साराबंदीची चळवळ करण्याचा एकदा निर्णय घेतल्यानंतर मागण्या मान्य करून घेण्यासाठी वाटेल ते कष्ट सहन करण्याची तयार रयतेने कायम ठेवली. मिरज संस्थानात गेली ६० वर्षे सारावाढ केलेली नाही या सबबीवर श्रीमंत राजेसाहेबांनी मिरज

संस्थानातील रयतेवर जबर, अन्याय्य आणि असहाय्य असा सारा लादला. मिरज संस्थानच्या रयतेची आर्थिक स्थिती अतिशय खालावलेली असल्यामुळे वाढीव सारा देण्याचे त्राण आमच्यामध्ये नाही तो कमी करावा असे रयतेने विनंती अर्जाद्वारे कळविले परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

मिरज संस्थानातील रयतेने साराबंदीची चळवळ ही घटनात्मक, सनदशीर मार्गाचा अवलंब करुन केली. त्यामध्ये, विनंती अर्ज, लोकसभा भरवणे, प्रार्थना करणे, ठराव मांडणे, शिष्टमंडळाच्या भेटी, मिश्र समितीची नेमणूक करुन तडजोड करण्याचे मार्ग स्वीकारले होते. वरील उपाय योजून जेव्हा वाढीव शेतसारा कमी करण्यास श्रीमंतानी नकार दर्शविला तेव्हा रयतेने हिराबागच्या ठिकाणी १९२८ मध्ये पहिला सत्याग्रह केला. या सत्याग्रहाच्या वेळी मिरज संस्थानातील रयतेची उपस्थिती २,५०० होती यावरुन या संस्थानातील रयतेमध्ये जागृती किती मोठ्या प्रमाणात झालेली होती हे दिसून येईल. पहिल्या सत्याग्रहाच्या वेळी रयतेसमोर श्रीमंत राजेसाहेब आणि श्री. पुंडलिकजी कातगडे यांच्या करवी वाढीव सा-यासंबंधी चौकशी केली जाईल आणि त्यानंतरच सारा आकारणी निश्चित होईल असे जाहीर केले परंतु हे आश्वासन श्रीमंतानी पाळले नाही. उलट वकीलमंडळीची शेकडा ४०% प्रमाणाची सारावाढ योजना विचारात घेण्याचा प्रयत्न केला. म्हणून पुन्हा मिरज संस्थानात हिराबाग वाड्यासमोर रयतेने दुसरा सात दिवसांचा सत्याग्रहाचा यशस्वी लढा करुन दाखविला. हा लढा यशस्वी होऊ नये म्हणून दरबारतर्फे आटोकाट प्रयत्न केले परंतु रयतेने त्यास दाद दिली नाही. उलट आपल्या संघटित, एकजुटीच्या सामर्थ्यावर

तो सर्व संग्राहक राजकीय लढा यशस्वी केला.

मिरज संस्थानच्या सारावंदीच्या तीव्र आणि संघटित चळवळीमुळे श्रीमंतानी वाढीव साऱ्याच्या शेकडा २५% सारा सूट दिली आणि रयतेच्या वैयक्तिक तक्रारींचीही दखल घेण्याचे मान्य केले.

या सारावंदीच्या यशस्वी लढयामुळे दक्षिण महाराष्ट्रातील इतर संस्थानातील लढयांना हा लढा नमुनेदार आणि प्रेरणा देणारा ठरला.

मिरज संस्थानात पुन्हा सारावाढ संदर्भात १९३८ साली वाढीव साऱ्यासंबंधी लक्ष्मेश्वर येथे चळवळ उभी राहिली. धाऱ्या स्वस्ताई, दुष्काळ, अवर्षण, इत्यादी कारणामुळे रयतेची आर्थिकस्थिती खालावली म्हणून तेथील रयतेने सनदशीर मार्गाने, विनंती अर्जाद्वारे सारावाढ कमी करावी म्हणून अर्ज केला परंतु त्याची दखल घेतली गेली नाही म्हणून पुन्हा करबंदीचा निर्णय मिरज संस्थानच्या रयतेने घेतला. ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला परंतु त्यास पूर्वीसारखे उग्र स्वरूप येऊ नये म्हणून लक्ष्मेश्वर चौकशी समितीच्या अहवालाप्रमाणे सारा सूट शे.२०% प्रमाणात दिली. मिरज संस्थानातील रयतेने संघटित आणि जागृतपणे स्वसामर्थ्यावर जो सारावंदी संदर्भात लढा केला त्याचे फळ प्रजेला मिळाले. या सर्व चळवळीचा वृत्तांत या प्रकरणात देण्यात आला आहे.

या प्रबंधाच्याचौथ्या प्रकरणात, मिरज संस्थानातील कायदेमंडळाचे स्वरूप, अधिकार व कार्य यांचा अभ्यास करण्यात आला आहे. मिरज संस्थानच्या प्रजापरिषदेमार्फत प्रथमपासूनच कायदेमंडळाची मागणी केली. त्यास अनुसरून मिरज संस्थान कायदेमंडळ निर्माण करण्याची घोषणा

श्रीमंताकडून १९३१ मध्ये करण्यात आली. मिरज संस्थान कायदेमंडळाच्या संदर्भात १९३२ मध्ये पहिला रेग्यूलेशन कायदा केला आणि त्याप्रमाणे कायदेमंडळात सरकारनियुक्त व बिगर सरकारनियुक्त आणि लोकनियुक्त सभासदांचे प्रतिनिधित्व घेण्यात आले. याप्रमाणे मिरज संस्थान कायदेमंडळाची सन १९३२ पासून ते १९४० सालापर्यंत एकूण सहा अधिवेशने, दर एक किंवा दोन वर्षांच्या फरकाने भरविली गेली. या अधिवेशनात जबाबदार राज्यपध्दतीची स्थापना, पाणी पुरवठा, सभाबंदी, परस्थाचा कायदा रद्द करणे, खाजगी खर्चावर मर्यादा, शेतीसुधारणा, व्यापारास उत्तेजन देणे, अस्पृश्यता निवारण, सार्वत्रिक व शक्तीचे प्राथमिक शिक्षण, लोकल बोर्डाची स्थापना, शेतसाऱ्यात सुट आणि कायदेमंडळात लोकप्रतिनिधित्वाच्या सभासद संख्येत वाढ करणे या संबंधी विविध ठरावांद्वारे सविस्तर चर्चा केली.

मिरज संस्थानच्या कायदेमंडळाची रचना अधिकार व कार्य हे आधुनिक काळातील कायदेमंडळाप्रमाणे करण्यासाठी सतत मागणी प्रजापरिषदेने केली. त्याचा परिणाम म्हणून मिरज संस्थानात सन १९४५ आणि सन १९४७ मध्ये द्विदल राज्यपध्दतीने दोन हप्ते श्रीमंतानी दिले. अंतिमत: संपूर्ण लोकप्रतिनिधीत्व असलेले कायदेमंडळ देण्यात आले आणि मिरज संस्थानात संपूर्ण जबाबदार राज्यपध्दतीने राज्यकारभार करण्यास सुरुवात केली. मिरज संस्थानच्या कायदेमंडळात निवडून आलेल्या तीन सभासदांचे एक कार्यकारी मंडळ नेमून त्यांच्याकडे लोकपयोगी खाती देण्यात आली व लोकशाही पध्दतीने राज्यकारभार केला. मिरज संस्थानच्या कार्यकारीमंडळात तीनही तालुक्यांना समान प्रादेशिक प्रतिनिधित्व दिले होते. मिरज संस्थानमधील

प्रजेच्या मागणीनुसार कायदेमंडळाच्या आर्थिक, कायदेविषयक आणि कार्यकारी विषयक क्षेत्रात बदल करण्यात आला. मिरज संस्थान कायदेमंडळाचे बदलत गेलेले स्वरूप आणि त्याचे अधिकार व कार्याबाबत या प्रकरणात चर्चा करण्यात आली आहे.

या प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणात, मिरज संस्थानातील "विलिनीकरणाच्या चळवळीचा" आढावा घेण्यात आला आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर राजकीय परिस्थितीमध्ये बदल घेऊन हिंदुस्थानला स्वातंत्र्य लवकरात लवकर देण्याची घोषणा करण्यात आली. त्याप्रमाणे दक्षिण महाराष्ट्रातील सर्व संस्थानातील राज्यकारभार हा सामाईक पध्दतीने करावा. सर्व संस्थानासाठी छोटया संस्थानांची संघराज्य योजना अंमलात आणण्याची प्रक्रिया सुरु झाली. या प्रक्रियेनुसार मिरज संस्थानच्या कांही पुढाऱ्यानी आणि श्रीमंतानी संघराज्य योजनेस संमती दिली. परंतु संघराज्य योजनेचा प्रयोग जेव्हा राजमंडळातील समाविष्ठ झालेल्या राजप्रमुखांनी स्वार्थीवृत्तीने केला तेव्हा त्याचे विसर्जन ही ताबडतोब झाले. मिरज संस्थानातील प्रजेला आणि प्रजापरिषदेच्या श्री. बा. वि. उर्फ तात्या शिखरे यांना निदान छोटया संस्थानिकांचे तरी संघराज्य निर्माण व्हावे असे वाटत होते. त्यासाठी त्यांनी आठ संस्थानिकांमध्ये जाऊन प्रचार ही केला परंतु जेव्हा प्रजेचे मत बदललेले आहे आणि दक्षिण महाराष्ट्रातील सर्व प्रजापरिषदानी विलिनीकरणाचाच निर्णय घेतलेला आहे हे लक्षात येताच मिरज संस्थान प्रजापरिषदेनेही आणि संस्थानचे श्रीमंतानाही, प्रजेच्या संमतीनुसार विलिनीकरणाचा निर्णय घेतला.

मिरज संस्थान अखिल भारतात विलीन करण्यासाठी संस्थानी खात्यास कांहीच कारवाई करावी लागली नाही. मिरज संस्थानचे

विलिनीकरण हे प्रजेने, प्रजापुढा-यांनी व शेवटी संस्थानचे प्रमुख श्रीमंत राजेसाहेबांनी घडवून आणले मिरज संस्थानच्या विलिनीकरणा-च्या राजकारणाचे या प्रकरणात वर्णन करण्यात आले आहे.

मूल्यमापन:

दक्षिण महाराष्ट्रातील १८ संस्थानांपैकी मिरज संस्थान हे एक लहान संस्थान होते. दक्षिण महाराष्ट्रातील इतर संस्थानांपेक्षा वेगळ्या प्रकारे राजकीय लढ्याची उभारणी करुन मिरज जनतेने हक्क संपादन केले. दक्षिण महाराष्ट्रातील फलटण, औंध, सांगली या संस्थानांमध्ये राजकीय सुधारणा संस्थानिक प्रमुखांनी स्वत:हून केल्यामुळे तेथील प्रजेने राजकीय लढे तिव्र स्वरुपाचे दिले नाहीत. परंतु मिरज संस्थानामध्ये प्रत्येक अधिकारासाठी प्रजेस झगडावे लागले.

मिरज संस्थान हे आर्थिक दृष्टया मागासलेले संस्थान होते, मिरज संस्थानी प्रजेला, राजकीय, सामाजिक, आर्थिक सुधारणांची अधिक गरज होती परंतु मिरज संस्थानच्या श्रीमंतांनी त्याकडे दूर्लक्ष केल्यामुळे प्रजा-परिषदेच्या लढ्यास सुरुवात झाली.

मिरज संस्थानच्या एकतंत्री आणि सरंजामशाही राजवटीविरुद्ध प्रजेने, मिरज संस्थान प्रजापरिषदेसारख्या, राजकीय संघटनेची स्थापना केली. ही संघटना मिरज संस्थानातील राजकीय लढ्याचे प्रमुख साधन होती. या संघटनेद्वारा लोकांनी आपले राजकीय अधिकार संपादन केले. मिरज संस्थानच्या प्रजापरिषदेच्या चळवळीची कांही वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) मिरज संस्थान प्रजापरिषदेचा लढा हा केवळ राजकीय सुधारणे-करिता नव्हता तर प्रजा पुढाऱ्यानी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणेचीही मागणी लढयाद्वारे केली होती.

२) या चळवळीतील पुढाऱ्यांनी केलेल्या मागण्याचा विचार केला तर असे दिसते की, देशाच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक सुधारणा कोणत्या होत्या याचा विचार त्यांनी केला होता. उदा. पाटबंधारे आणि शेतीपाणी पूरवठा, अस्पृश्यता निवारण, दुष्काळी कामे, सार्वत्रिक आणि शक्तीचे प्राथमिकशिक्षण इत्यादी मागण्या प्रजा-परिषदेने केल्या.

संस्थानात खऱ्या अर्थाने लोकराज्य स्थापन करावे अशी त्यामागील प्रेरणा होती. म. गांधी आणि पं. नेहरूंची वैचारिक प्रेरणा या चळ-वळीच्या मागे स्पष्टपणे काम करित असलेली आपणास दिसते.

३) मिरज संस्थानातील प्रजापरिषदेची महत्वाची चळवळ म्हणजे साराबंदीची चळवळ होय. या चळवळीमध्ये जनतेने फार मोठ्या प्रमाणात भाग घेतला. राजकीय प्रतिकाराचा गांधीवादी मार्ग प्रजेने स्विकारला आणि कोणत्याही प्रकारची हिंसा होऊ न देता आपल्या मागण्या केवळ जनमताच्या रेट्यावर (प्रभावावर) सरकारकडूनमान्य करून घेतल्या. या चळवळीचे यश इतके दैदिप्यमान होते की, ह्या चळवळीला छोटी बार्डोलीची चळवळ असे नांव प्राप्त झाले. परदेशातील वर्तमानपत्रानेही त्याची नोंद घेतली.

४) मिरज संस्थान हे दक्षिण महाराष्ट्रातील छोट्या संस्थानापैकी एक छोटे संस्थान होते. या संस्थानापैकी, औंध, फलटण, सांगली या

संस्थानातील राजेसाहेबांनी लोकमतानुवर्ती शासन स्थापन करण्यास विरोध केला नाही. औंधच्या राजेसाहेबांनी तर आपल्या छोटयाशा संस्थानात पुढाकार घेऊन ग्रामराज्याची योजना अंमलात आणली. ग्रामीण पातळीवर लोकराज्याची ही कल्पना अभिनव होती. ह्या ग्रामराज्याचे पडसाद १९४२ ते १९४७ या काळात साता-यात जे प्रतिसरकार स्थापन झाले होते त्या सरकारच्या राज्यव्यवस्थेवरही पडले. सांगली आणि फलटण येथील राजेसाहेब उदारअंत:करणाचे होते. प्रजापरिषदेला ख-या अर्थाने संघर्ष कोल्हापूर आणि मिरज येथेच करावा लागला. मिरज संस्थानच्या राजेसाहेबांनी अडवणूकीचे धोरण अवलंबिले आणि त्यामुळे संघर्ष झाला. या संघर्षात शेवटी प्रजापरिषदेचाच विजय झाला.

५) मिरज संस्थानातील राजकीय प्रतिकाराच्या चळवळीचा आपण अभ्यास केला तर आपणास असे दिसून येईल की, याचळवळीने दबाव तडजोड-दबाव या मार्गाचा अवलंब केला. म. गांधी याच प्रकारच्या राजकारणाचा अवलंब करित होते. मिरज संस्थानच्या राजेसाहेबांजवळ अडवणूक करण्याबद्दल हेकेखोरपणा असला तरी प्रखर आणि तिव्र चळवळीला सातत्याने आणि खंबिरपणे तोंड देण्याचा कणखर पणा नव्हता. त्यामुळे ते तडजोडीला तयार होत आणि पुन्हा त्यांच्या स्वभावातील काही दोषामुळे वचनभंग करीत. प्रजापरिषदेच्या पुढा-याच्या ही गोष्ट लक्षात आल्यामुळे दबाव-तडजोड-दबाव या आंदोलन पध्दतीचा योग्य असा वापर केला.

६) मिरज संस्थान प्रजापरिषदेच्या चळवळीमध्ये त्या काळात कोल्हापूर आणि इतरत्र ठिकाणी प्रचलित असलेल्या ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाचा फारसा उपद्रव झाला नाही. त्याचे कारण

असे की, प्रजापरिषदेचे पुढारी जरी प्रामुख्याने ब्राह्मण असले तरी त्यामध्ये इतर जातींचाही समावेश होता. त्यामुळे कायदेमंडळात आणि नंतर मंत्रीमंडळात प्रतिनिधित्व देत असताना सर्व जातींना योग्य असे प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तेवढा वितुष्ट या चळवळीत जाणवले नाही.

७) प्रजापरिषदेचे मुख्य पुढारी श्री. तात्या शिखरे यांनी सुरवातीपासूनच या चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी स्वत:साठी कोणत्याही राजकीय पदाची आकांक्षा न धरता आपले काम पुढे चालवले. ते गांधीजींचे सच्चे अनुयायी असल्यामुळे श्री. बाळासाहेब खेर यांनी मुंबई विधानसभेचे आमदार होण्याची विनंती केली असतानाही ती स्वीकारली नाही आणि सर्वोदय कार्यक्रमाला आपले जीवन वाहून घेतले.

८) स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये बऱ्याच संस्थानामधील संस्थानिकांना आपले संस्थान स्वतंत्र ठेवावे असे वाटत होते परंतु प्रजेला मात्र स्वतंत्र, सार्वभौम आणि लोकसत्ताक भारतामध्ये सामील व्हावयाचे होते. इतिहासाचा विकासक्रमही त्याच दिशेने वाटचाल करीत होता अशा परिस्थितीमध्ये कांही संस्थानिकांनी आडमुठेपणा केला. काही संस्थानांतील प्रजापरिषदेचे कांही पुढारीही स्वतंत्र संस्थानच्या कल्पनेला भुलले. परंतु मिरज संस्थान प्रजा-परिषदेचे पुढारी मात्र त्या बाबत ठाम राहिले. संस्थानी स्वराज्याचा पोरखेळ त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी विलिनीकरणाला पाठिंबा दिला. काळाचा महिमा राजेसाहेबांनी ओळखून त्यास फारसा विरोध केला नाही.

स्वतंत्र आणि सार्वभौम भारतामध्ये जवळजवळ साडेपाचशे संस्थानचे विलिनीकरण करणे महत्वाचे पण अवघड असे काम होते. कारण स्वतंत्र भारताची आधुनिक राष्ट्र म्हणून निर्मिती करणे गरजेचे होते. त्याशिवाय लोकांच्या विकासाचे, शिक्षणाचे आणि पोटापाण्याचे प्रश्न सुटणार नव्हते. ज्याठिकाणी प्रजापरिषदेच्या चळवळी नव्हत्या किंवा कमजोर होत्या त्या ठिकाणी सरंजामदाराचे वर्चस्व समाजावर कायम राहिले. प्रजा संस्थानिकांवर अनुरक्त राहिली तो भागही अजून मागासलेला आहे. उदा. मध्यप्रदेश, राजस्थान आणि ओरिसा या प्रांतातील संस्थाने आणि या प्रांतातील संस्थानिकांनी रामराज्य परिषद, हिंदुमहासभा, जनसंघ आणि स्वतंत्रपक्ष इत्यादी उजव्या आणि प्रतिगामी पक्षाला पाठिंबा दिला. या उलट ज्या भागामध्ये प्रजापरिषदेची चळवळ खोलवर लोकांच्या मनामध्ये रुजलेली होती त्या भागात लोकशाहीवादी पक्षाने आपली मुळे बळकट केली. तीथे विलिनीकरणाला आणि राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेला फारशे आव्हान दिले गेले नाही. मिरजमध्ये तर ही प्रक्रिया फार लवकर घडून आली आणि मुंबई इलाख्याच्या इतर भागात संस्थानातील जनता बेमालूम मिसळून गेली. समाजातील लोकशाहीवादी आणि प्रगतशील शक्तींना अशारितीने कार्यरत करण्याचे, बळ देण्याचे ऐतिहासिक कार्य मिरज संस्थान प्रजापरिषदेच्या चळवळीने केले, ही या चळवळीची फलश्रुती आहे.

.....